महाराष्ट्र शासन
नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग
भूमि संपादन विशेष अधिकारी (११), कोल्हापूर

दूरध्वनी क्र.(०२३१) २६४२७५३ — १०९१, सी वॉर्ड, बिंदूचौक, कोल्हापूर
Email- slao11kolapur@gmail.com

जा.क्र./एलएक्यू/स्पे/४८१/ इचलकरंजी /भूसंविअ-११को/ २८३ — दिनांक- २३/०८/२०२४

प्रति,

मा.सहायक संचालक,
नगर रचना, इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी
जि.कोल्हापूर.

**विषय :-** भूसंपादन- इचलकरंजी – एलएक्यू/स्पे/४८१
मंजूर विकास योजना इचलकरंजी (दुसरी सुधारित) या मधील आ.क्र. V/१४ " क्रिडांगण" यासाठी शहापूर गट नं. १३८ पै. त्याचा सि.स.नं. १८५३६ पै अंदाजित क्षेत्र १ हे. ८७ आर क्षेत्राचे भूसंपादन करणेप्रकरणी.
महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम १२६(४) सह भूमी संपादन,पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३ चे कलम १९ अन्वयेची अधिसूचना व कलम **२१ (१)** व (२) अन्वयेचे प्रकट पत्र प्रसिध्द करणेबाबत.

नगर ८९१ २४/०८/२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग- एक पुणे विभागीय पुरवणी मध्ये दिनांक १६ ऑगस्ट २०२४ रोजी पृष्ठ क्र.१ व २ वर प्रसिध्द झालेली कलम १९ ची अधिसूचना.

महोदय,

विषयांकित प्रकरणी नवीन भूसंपादन अधिनियम, २०१३ चे कलम १९ नुसारची अधिसूचना दि.१६/०८/२०२४ चे महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग एक पुणे विभागीय पुरवणीमध्ये पृष्ठ क्र. १व २ वर प्रसिध्द झालेली आहे. सदरच्या राजपत्राची प्रत सोबत जोडली आहे.

तसेच विषयांकित प्रकरणी उक्त अधिनियमाच्या कलम २१ च्या पोटकलम १ व २ मधील तरतुदीनुसार प्रसिध्द करावयाच्या प्रकटपत्राची प्रत सोबत जोडली आहे.

प्रकरणी उक्त अधिनियमाच्या कलम १९ ची अधिसूचना व कलम २१ (१) (२) चे प्रकट पत्र आपल्या कार्यालयाच्या सूचना फलकावर डकवून दोन दिवसात प्रसिध्द करावे व प्रसिध्द केल्याचा अहवाल उलट टपाली या कार्यालयास पाठवावा, ही विनंती.

आपला,

(गुलाबराव हे.झांबरे)
प्र. भूमी संपादन विशेष अधिकारी (११),
कोल्हापूर

सहपत्र - कलम १९ ची अधिसूचना प्रसिध्दीचे राजपत्र व
कलम २१ (१)(२) चे प्रकट पत्र

इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी
इ.न.प.
क्रमांक

RNI No. MAHBIL 2012/47976
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग एक–पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १३, अंक - ०५ ] शुक्रवार, ऑगस्ट १६, २०२४ / श्रावण २५, शके १९४६ [ पृष्ठे ०२

**असाधारण क्रमांक ०५**

**प्राधिकृत प्रकाशन**

जिल्हाधिकारी यांजकडून

(नमुना १-अ)

**जिल्हा कोल्हापूर**

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२६, पोट-कलम (४) सह भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम १९ अन्वये.*

**अधिसूचना**

क्रमांक कार्यासन-११/भूसं/आरआर/एलएक्यू/स्पे/४८१/इचलकरंजी/७८३/सन २०२४.— ज्याअर्थी, इचलकरंजी शहराच्या मूळ हद्दीच्या भागश: क्षेत्राची व वाढीव हद्दीची सुधारित विकास योजना (यापुढे "उक्त विकास योजना" म्हणून संबोधिलेली) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे "उक्त नगररचना अधिनियम" म्हणून संबोधिलेला ) चे कलम ३१ *(१)* नुसार नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टीपीएस-२१११/१३५२/सीआर-१९/१२/डी.पी.सॅन्क्शन/युडी-१३, दिनांक २४ मे २०१२ अन्वये मंजूर झाली असून ती दिनांक १० जुलै २०१२ पासून अंमलात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत मौजे शहापूर, तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर येथील सोबतच्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या सि.स.नं. १८५३६ पै. (गट नंबर १३८ पै.) (यापुढे "उक्त जमीन" म्हणून संबोधिलेली) ही जमीन आरक्षण क्रमांक V/१४, "क्रीडांगण" या सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षित आहे (यापुढे "उक्त सार्वजनिक प्रयोजन" म्हणून संबोधिलेले) ;

आणि ज्याअर्थी, इचलकरंजी महानगरपालिकेने नियोजन प्राधिकरण म्हणून (यापुढे "उक्त महानगरपालिका" म्हणून संबोधिलेली) उक्त नगररचना अधिनियमाचे कलम १२६ अन्वये उक्त जमीन, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादन करणेबाबत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे दिनांक १४ नोव्हेंबर २०२२ चे पत्र क्रमांक इमपा/नरवि/१२२२/प्र.क्र.०१०/१२१९/२२ अन्वये प्रस्ताव सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभागाकडील उक्त नगररचना अधिनियमाच्या कलम १५१, पोट-कलम *(१)* खालील अधिसूचना क्रमांक टीपीएस-२१७५/५१०६/युडी-७, दिनांक ३ मार्च १९७९ अन्वये, मंजूर विकास योजनेत सार्वजनिक प्रयोजनासाठी विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या जमिनींच्या संपादनाबाबतच्या उक्त नगररचना अधिनियमाच्या कलम १२६, पोट-कलम *(१)*, *(२)* व *(४)* खालील राज्य शासनाने वापरावयाच्या शक्ती त्या-त्या जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त नगररचना अधिनियमाच्या कलम १२५ मध्ये सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ५ *(१)* अन्वये दाखल मजकूर व ५ *(२)* अन्वये दाखल परंतुकानुसार उक्त नगररचना अधिनियम अंतर्गत विकास योजनेतील आरक्षित जमिनीचे संपादन करताना भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (यापुढे "उक्त भूसंपादन अधिनियम" म्हणून संबोधिलेला) मधील कलम ४ ते १५ (दोन्हीसह) यामध्ये विनिर्दिष्ट केलेली कार्यपद्धती, अशा जमिनीच्या संदर्भात लागू होत नाहीत. तसेच शासनाच्या नगर विकास विभागाकडील दिनांक ८ मार्च २०१९ चे पत्र क्रमांक टीपीएस/१८१९/१७९६/प्र.क्र.२९८/१८/नवि-१३ अन्वये, "उक्त नगररचना अधिनियमांतर्गत विकास योजनेतील आरक्षित जमिनींचे संपादन करताना उक्त भूसंपादन अधिनियमातील कलम ११ *(१)*, १६ ते १८ व यासोबतच परिशिष्ट २ व ३ तसेच या अनुषंगिक कलमे लागू होणार नाहीत." अशा मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, सोबत जोडलेल्या अनुसूची-१ मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची अनुसूची-२ मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या व उक्त विकास योजनेत आरक्षण क्रमांक V/१४, "क्रीडांगण" यासाठी आरक्षित केलेल्या जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता असल्याबाबत समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांची खात्री झाली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या संपादनापोटी द्यावयाच्या नुकसान भरपाईची संपूर्ण रक्कम उक्त महानगरपालिकेने अदा करावयाची आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाने प्रदत्त केलेल्या अधिकारांचा वापर करून आणि उक्त नगररचना अधिनियमाच्या कलम १२६, पोट-कलम *(४)* सह भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम १९ अन्वये जिल्हाधिकारी, कोल्हापूर याद्वारे असे घोषित करतात की, उक्त जमीन उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहेत.

उक्त भूसंपादन अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, कोल्हापूर उक्त भूसंपादन अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी भूमी संपादन विशेष अधिकारी (११), कोल्हापूर यांस पदनिर्देशित करीत आहेत.

त्याचप्रमाणे उक्त जमीन उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादन करणेबाबतची कार्यवाही आवश्यक त्या सर्व व्यवस्था करून सुरू करावी व ताब्यात घ्यावी, असे निर्देश देण्यात येत आहेत.

## अनुसूची-एक

### संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

### जिल्हा कोल्हापूर, तालुका हातकणंगले, मौजे शहापूर

| अ. क्र. | भूमापन क्रमांक/ गट नंबर | अंदाजित क्षेत्र | चतु:सीमा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ (चौ.मी.) |
| १ | सि.स.नं. १८५३६ पै. (गट क्र. १३८ पै.) | १८७०० | पूर्व- सि.स.नं. १८५३६ पै. उर्वरित क्षेत्र<br>पश्चिम- सि.स.नं. १८५७४ व १८५७६<br>उत्तर- रस्ता<br>दक्षिण- सि.स.नं. १८५९७ |

## अनुसूची दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव.–** मौजे शहापूर, तालुका हातकणंगले येथील सि.स.नं. १८५३६ पै. (गट क्रमांक १३८ पै.), जमीन इचलकरंजी शहराच्या मूळ हद्दीच्या भागश: क्षेत्राच्या व वाढीव हद्दीच्या मंजूर सुधारित विकास योजनेतील आरक्षण क्रमांक V/१४, "क्रीडांगण" यासाठी भूसंपादन करणे.

**प्रकल्पाच्या कामाचे वर्णन.–** आरक्षण क्रमांक V/१४, "क्रीडांगण" यासाठी भूसंपादन करणे.

**समाजाला होणारे लाभ.–** पायाभूत सुविधा, सोयीसुविधा.

## अनुसूची तीन

### पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

### जिल्हा कोल्हापूर, तालुका हातकणंगले, मौजे शहापूर

| अ. क्र. | भूमापन क्रमांक किंवा गट नंबर | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## अनुसूची चार

### (पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

निरंक

**टीप :** उक्त जमिनीचा नकाशा भूमी संपादन विशेष अधिकारी (११), कोल्हापूर यांच्या १०९१, सी वॉर्ड, बिंदू चौक, कोल्हापूर येथील कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत निरीक्षणासाठी उपलब्ध आहे.

**अमोल येडगे,**
(भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी, कोल्हापूर.

कोल्हापूर, १४ ऑगस्ट २०२४.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

**भूसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम २१ च्या पोट कलम (१) व (२) अन्वये प्रसिध्द करावयाचे प्रकटपत्र.**

यावरुन जाहिररित्या जाणीव करुन देण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ (४) सह भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वये दि.१६/०८/२०२४ चे महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग-एक पुणे विभागीय पुरवणीमध्ये पृष्ठ क्र. १ व २ वर प्रसिध्द झालेली मा.जिल्हाधिकारी,कोल्हापूर यांची अधिसूचना क्र.कार्यासन-११/भूसं/आरआर/एलएक्यू/स्पे/४८१/इचलकरंजी ७८३/सन-२०२४, मध्ये नमूद मौजे शहापूर गावात किंवा गावाजवळ असलेल्या जमिनींपैकी खाली दर्शविलेल्या सि.स.नं. /गट नं. मधील नुकतीच निशाणी केलेली, त्यावर असलेली विहीर, झाडे झुडपे वगैरेसह खाली दर्शविल्याप्रमाणे कमी किंवा अधिक भरणारी जागा सरकारकडून लवकरच इचलकरंजी शहराच्या मुळ हद्यीच्या भागश: क्षेत्राची व वाढीव हद्दीची मंजूर सुधारित विकास योजनेतील जमीन आरक्षण क्र.V/१४ "क्रिडांगण" या सार्वजनिक प्रयोजनासाठी ताब्यात घेण्यात येणार आहे.

तरी सदरहू जमिनीत हितसंबध असलेल्या सर्व इसमांस यावरुन फर्मविण्यात येते की, त्यांनी भूमि संपादन विशेष अधिकारी (११), कोल्हापूर १०९१, सी वॉर्ड, बिंदू चौक, कोल्हापूर यांच्या कार्यालयात दि. ३०/९/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता जातीने अगर अभिकर्ता मार्फत हजर राहून सदरहु जमिनीतील आपआपल्या हितसंबधाचा प्रकार, त्यासंबंधात मिळावयाच्या मोबदल्याच्या रकमेचा तपशील व सदरहू अधिनियमाचे कलम २० अन्वये केलेल्या जागेच्या मोजणी संबंधी काही हरकती असल्यास त्याची संपूर्ण तपशीलवार माहिती दयावी, चुकू नये.

**परिशिष्ट**

**संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन**

**गावाचे नांव - मौजे शहापूर, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर**

| अ.क्र. | संपादनाखालील मिळकती<br>भूमापन क्र.किंवा गट नं. | संयुक्त मोजणी विवरण पत्रानुसारचे क्षेत्र चौ.मी. | भसूपांदना खालील अंदाजे क्षेत्र चौ.मी. | चतु:सिमा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | सि.स.नं.१८५३६ पै (गट क्र.१३८ पै) | १८७०० | १८७०० | पुर्व-सिसनं १८५३६ पै उर्वरीत क्षेत्र<br>पश्चिम-सिसनं १८५७४ व १८५७६<br>उत्तर- रस्ता<br>दक्षिण -सिसनं १८५९७ |

**ज्यासाठी जमीन संपादन करावयाची आहे ते प्रयोजन :-**

मौजे शहापूर, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथील सि.स.नं.१८५३६ पै. (गट क्र.१३८ पै), जमीन इचलकरंजी शहराच्या मुळ हद्यीच्या भागश: क्षेत्राची व वाढीव हद्दीची मंजूर सुधारित विकास योजनेतील जमीन आरक्षण क्र.V/१४ "क्रिडांगण" यासाठी भूसंपादन करणे.

जा.क्र. एलएक्यू/स्पे/४८१/ इचलकरंजी /भूसंविअ-११को/ २८२
दिनांक :-२३/०८/२०२४
ठिकाण : १०९१, सी वॉर्ड, बिंदूचौक, कोल्हापूर

(गुलाबराव ह.झांबरे)
प्र. भूमी संपादन विशेष अधिकारी (११),
कोल्हापूर

भूमि संपादन विशेष अधिकारी कोल्हापूर

D:\mp\Techanical\laq 481\कलम 21 जाहीर प्रसिध्दीकरण